


लईराई देवीची जत्रा
२मे पासून
पान ३ वर

आपलं, आपल्यासाठी, सर्वांसाठी

www.dainikherald.com

# दैनिक हेराल्ड



मुंबई इंडियन्स विजयी लय
कायम राखणार?
पान ४ वर

वेर्णा, रविवार, २७ एप्रिल २०२५ | पाने ४ | ₹ ४

| REG. NO. G2/RNP/GOA/101/2021-23 | Volume 13, Issue 234 | Verna, | facebook.com/dainikherald | Sunday 27 April 2025 | Pages 4 | ₹ 4

## निवडक

### इराणच्या बंदर अब्बास पोर्टवर स्फोट

**तेहरान, दि. २६ :** दक्षिण इराणच्या बंदर अब्बासमधील शाहिद राजाई बंदरात शनिवारी भीषण स्फोट झाल्याची घटना समोर आली आहे. या स्फोटात ४ जणांचा मृत्यू तर ५०० हून अधिक झाले आहेत. या स्फोटानंतर लागलेल्या आगीमुळे बंदरातील कामकाज थांबवण्यात आले आहे, अशी इराणच्या निम शासकिय वृत्तवाहिनी तस्निमने याबद्दल माहिती दिली आहे. इराणी अधिकाऱ्यांनी सांगितले की, बंदर अब्बास पोर्टच्या बाहेर, शाहिद राजाई बंदराच्या सिना कंटेनर यार्डमध्ये हा स्फोट झाला. येथे तेल आणि इतर पेट्रोकेमिकल सुविधांसह वाहतूक कंटेनर साठवले जातात. बचाव कर्मचारी घटनास्थळावरून लोकांना बाहेर काढण्याचा प्रयत्न करत आहेत. इराणी माध्यमांचे म्हणणे आहे की, स्फोटामुळे कोणत्याही ऊर्जा पायाभूत सुविधांचे नुकसान झाले नाही.

-------------

### कैलास मानसरोवर यात्रा सुरू होणार

**नवी दिल्ली, दि. २६ :** कैलास मानसरोवर यात्रा ३० जून ते २५ ऑगस्ट दरम्यान होणार आहे. शनिवारी परराष्ट्र मंत्रालयाने अर्ज प्रक्रियेसाठी वेबसाइट उघडली. अर्ज करण्याची शेवटची तारीख १३ मे २०२५ आहे. यावर्षी, यात्रेकरूंचे १५ गट उत्तराखंड आणि सिक्कीम मार्गे कैलास मानसरोवरला जातील. उत्तराखंडहून लिपुलेख खिंड ओलांडून ५ गटात ५०–५० प्रवासी मानसरोवरला जातील. त्याच वेळी, १० बॅचमध्ये प्रत्येकी ५० प्रवाशांचे गट सिक्कीमहून नाथुला मार्गे प्रवास करतील. कैलास मानसरोवर चीनव्याप्त तिबेटमध्ये आहे. परराष्ट्र मंत्रालय दरवर्षी या सहलीचे आयोजन करते. तथापि, गेल्या पाच वर्षांपासून चीन भारतीयांना कैलास मानसरोवरला जाऊ देत नव्हता. दोन्ही देशांमधील सीमा वाद आणि कोविड लाट हे याचे कारण होते. आता ५ वर्षांनंतर प्रवास पुन्हा सुरू होणार आहे.

------------

### तहव्वुर राणाकडून तपासात असहाकार्य

**नवी दिल्ली, दि. २६ :** २६/११ च्या मुंबई हल्ल्यातील प्रमुख सूत्रधारांपैकी एक असलेल्या तहव्वुर राणा याची मुंबई गुन्हे शाखेने दिल्लीत जाऊन चौकशी केली. मुंबई गुन्हे शाखेचे एक पथक दिल्लीत पोहोचले आणि त्यांनी तहव्वुर राणा याची ८ तासांहून अधिक चौकशी केली. तहव्वुर राणा उडवाउडवीची उत्तरे देत असून तो तपासात सहकार्यही करत नसल्याचे मुंबई पोलिसांनी म्हटले आहे. तहव्वुर राणाला दिल्लीतील एनआयए मुख्यालयातील कोठडीत ठेवण्यात आले आहे. २६/११ च्या मुंबई हल्ल्यात १६६ लोकांचा बळी गेला होता आणि अनेक पोलिस अधिकारीही शहीद झाले होते. तहव्वुर राणाची दिल्लीतील राष्ट्रीय तपास संस्थेच्या मुख्यालयात चौकशी सुरू आहे. ६४ वर्षीय दहशतवादी राणाला १० एप्रिल रोजी न्यायालयाने १८ दिवसांच्या एनआयए कोठडीत सुनावली होती. तपास संस्था सध्या त्याची कसून चौकशी करत आहे. राणाची नातेवाईकांशी फोनवर बोलण्याची परवानगी देण्याची मागणी न्यायालयाने फेटाळून लावली.

-------------

### गुजरातमधून हजारो बांगलादेशी ताब्यात

**सूरत, दि. २६ :** जम्मू–काश्मीरमधील पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर देशभरातील परदेशी नागरिकांवर कारवाई सुरू झाली आहे. अहमदाबाद (८९०) आणि सुरत (१३४) येथे पोलिसांनी शनिवारी महिला आणि मुलांसह सुमारे एक हजार बेकायदेशीर बांगलादेशी स्थलांतरितांना ताब्यात घेतले. जर वैध कागदपत्रे सापडली नाहीत, तर त्यांना भारतातून हद्दपार केले जाईल. गुजरातचे गृह राज्यमंत्री हर्ष संघवी म्हणाले, यापैकी बरेच लोक ड्रग्ज आणि मानवी तस्करीमध्ये सामील आहेत आणि अलिकडेच अटक केलेल्या चार बांगलादेशींपैकी दोन अल–कायदाच्या स्लीपर सेलसाठी काम करत होते. या बांगलादेशींची पार्श्वभूमी आणि गुजरातमधील त्यांच्या कारवायांची चौकशी केली जाईल. हरियाणामध्ये राज्य सरकारने ४६० पाकिस्तानी नागरिकांना बाहेर काढण्याचा आदेश जारी केला आहे.

# १४ स्थानिक दहशतवाद्यांची यादी तयार

## सीमावर्ती भारतीयांकडून बंकर्स स्वच्छतेला सुरुवात | सैन्यदले झाली सज्ज

जम्मू, दि. २६ :

**पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्यात २६ नागरिकांचा बळी गेल्यानंतर जम्मू आणि काश्मीरमध्ये सुरक्षाविषयक चिंता वाढल्या आहेत. या पार्श्वभूमीवर गुप्तचर संस्थांनी प्रदेशात सक्रिय असलेल्या १४ स्थानिक दहशतवाद्यांची यादी तयार केली आहे, अशी माहिती एएनआयने आपल्या अहवालात दिली आहे. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, २० ते ४० वयोगटातील या दहशतवाद्यांचे पाकिस्तानातून येणाऱ्या दहशतवाद्यांना स्थानिक पातळीवर मदत व पाठबळ मिळवून देण्यात सक्रिय योगदान आहे.**



सर्व दहशतवादी पाकिस्तान समर्थित तीन प्रमुख दहशतवादी संघटनांशी संलग्न असल्याची माहिती आहे. हिज्बुल मुजाहिदीन, लष्कर–ए–तैयबा (एलईटी) आणि जैश–ए–मोहम्मद (जेईएम). यामध्ये तीन दहशतवादी हिज्बुल मुजाहिदीनशी, आठ लष्कर–ए–तैयबाशी आणि तीन जैश–ए–मोहम्मदशी संबंधित आहेत.

यापैकी आदिल रहमान डेंटू २०२१ पासून लष्कर–ए–तैयबाशी जोडलेला असून सध्या सोपोरमध्ये जिल्हा कमांडर म्हणून कार्यरत आहे. आसिफ अहमद शेख हा २०२२ पासून जैश–ए–मोहम्मदशी सक्रिय आहे व अवंतीपोराचा जिल्हा कमांडर आहे. अहसान अहमद शेख पुलवामामध्ये २०२३ पासून लष्कर–ए–तैयबासाठी कार्यरत आहे. आमिर नजीर वाणी व यावर अहमद भट हे दोघेही जैश – ए – मोहम्मदशी संबंधित असून २०२४ पासून सक्रिय आहेत.

आसिफ अहमद खांडे, नसीर अहमद वाणी, शाहिद अहमद कुटय, आमिर अहमद डार आणि अदनान सफी डार हे शोपियान जिल्ह्यात कार्यरत असून त्यांनी परदेशी दहशतवाद्यांना मदत करण्यासाठी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आहे.

अनंतनाग जिल्ह्यातील जुबैर अहमद वाणी ऊर्फ अबू उबैदा हा हिज्बुल मुजाहिदीनचा मुख्य ऑपरेशनल कमांडर असून, २०१८ पासून अनेक दहशतवादी कारवायांमध्ये सामील आहे. हारून रशीद गनई, अनंतनाग येथील आणखी एक हिज्बुल दहशतवादी, पाकव्याप्त काश्मीरमध्ये प्रशिक्षण घेतल्यानंतर पुन्हा दक्षिण काश्मीरमध्ये सक्रिय झाला आहे. कुलगाम जिल्ह्यातील झाकीर अहमद गनी हा लष्कर–ए–तैयबाशी संबंधित असून सुरक्षा दलांवर हल्ले व लक्ष्यित हत्यांमध्ये सहभागी असल्याचे समोर आले आहे.

पहलगाम हल्ल्यामुळे परदेशी दहशतवादी आणि स्थानिक भरती यांच्यातील वाढत्या संबंधांमुळे चिंता व्यक्त होत आहे. यामुळे सुरक्षा यंत्रणांनी विशेषतः दक्षिण काश्मीरमधील अनंतनाग व पुलवामा जिल्ह्यांमध्ये समन्वयित कारवाई सुरू केली आहे. वरिष्ठ अधिकाऱ्यांनी सांगितले की, या दहशतवाद्यांची यादी संभाव्य हल्ले रोखण्यासाठी आणि त्यांच्या रसद पुरवठ्यावर आघात करण्यासाठी तयार करण्यात आली आहे. पहलगाममधील पर्यटकांवर हल्ला करणाऱ्या पाच दहशतवाद्यांशी या १४ दहशतवाद्यांचा संबंध तपासला जात आहे.

हल्ल्यात सहभागी पाच दहशतवाद्यांपैकी तीन जण पाकिस्तानी नागरिक असल्याचे निष्पन्न झाले आहे. यामध्ये आसिफ फौजी, सुलेमान शाह व अबू तल्हा यांचा समावेश आहे. उर्वरित दोन स्थानिक दहशतवाद्यांची ओळख आदिल गुरी व अहसान अशी करण्यात आली आहे. या सर्वांवर प्रत्येकी २० लाख रुपयांचे बक्षीस जाहीर करण्यात आले आहे.

सध्या एनआयए व इतर सुरक्षा एजन्सी जम्मू–कश्मीर पोलिसांसोबत मिळून हल्ल्याच्या तपासात सक्रियपणे कार्यरत आहेत. एनआयएची टीम घटनास्थळाचा आढावा घेऊन फॉरेन्सिक पुरावे गोळा करणार असल्याची शक्यता वर्तवली जात आहे.

### 'मोदी बंकर्स' ची स्वच्छता सुरू

पहलगाममध्ये नुकत्याच घडलेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर जम्मू आणि काश्मीरच्या पूंछ जिल्ह्यात नियंत्रण रेषेवर (एलओसी) तणाव वाढला आहे. वाढत्या भीतीमुळे सीमावर्ती गावांतील नागरिकांनी जुने भूमिगत बंकर स्वच्छ करून ते पुन्हा तयार करण्यास सुरुवात केली आहे. सीमारेषेच्या जवळ असलेल्या या गावांमध्ये केंद्र सरकारने पंतप्रधान सुरक्षा वाढवण्यासाठी भूमिगत बंकर बांधले होते. या बंकरांना मोदी बंकर म्हणूनही ओळखले जाते. सलोत्री आणि करमार्हा यांसारख्या पाकिस्तानच्या सीमेलगतच्या गावांतील रहिवाशांनी खबरदारीचा उपाय म्हणून बंकर स्वच्छ करणे आणि आपत्कालीन साहित्याचा साठा करण्यास सुरुवात केली आहे. गेल्या काही काळात शांतता अनुभवलेल्या या गावकऱ्यांनी आता संभाव्य धोका लक्षात घेऊन तयारी वाढवली आहे. पूंछ आणि राजौरीसारख्या संवेदनशील भागांमध्ये सरकारने वैयक्तिक आणि सामूहिक बंकर बांधण्यासाठी आर्थिक व तांत्रिक सहाय्य दिले आहे. पहलगाममधील नुकत्याच झालेल्या दहशतवादी हल्ल्यात सुरक्षा कर्मचारी आणि नागरिकांचा बळी गेल्याने सीमावर्ती भागात घुसखोरीच्या शक्यतेबाबत चिंता वाढली आहे.

### पाकिस्तानची सारवासारव

काश्मीरमध्ये भारतीय पर्यटकांवर झालेल्या हल्ल्याची तटस्थ चौकशी करण्यात यावी, अशी मागणी पाकिस्तानने शनिवारी केली. सत्य बाहेर यावे आणि न्याय मिळावा यासाठी पाकिस्तान कोणत्याही तटस्थ तपास संस्थेसोबत सहकार्य करण्यास पूर्णपणे तयार आहे, असे पाकिस्तानचे गृहमंत्री मोहसिन नकवी यांनी पत्रकार परिषदेत सांगितले. भारतीय सुरक्षा दलांनी हल्ल्यात सहभागी संशयितांचा शोध सुरू ठेवला असून, किमान पाच संशयित दहशतवाद्यांची घरे काश्मीरमध्ये जमीनदोस्त करण्यात आली आहेत. पुलवामा जिल्ह्यातील मुर्रम गावात शनिवारी एका घराच्या जागी तुटलेल्या काचेचे तुकडे विखुरलेले दिसून आले. स्थानिकांनी सांगितले की, या घराचा मालक एहसान अहमद शेख, जो संशयित अतिरेकी होता, गेल्या तीन वर्षांपासून गावात दिसलेला नाही.

## डॉक्टरकडून नर्सवर बलात्कार; डॉक्टरच्या मुसक्या आवळल्या

■ *टीम दैनिक हेराल्ड*

**मडगाव, दि. २६ :** बाणावली येथील एका खाजगी क्लिनिकमध्ये कार्यरत असलेल्या परिचारिकेवर लैंगिक अत्याचार केल्याप्रकरणी डॉ. सॅम्युअल अरवाटिगी याला कुंकळ्ळी पोलिसांनी अटक केली आहे. ही कारवाई २५ एप्रिल रोजी सायंकाळी ४.३० वाजता करण्यात आली.

कुंकळ्ळी पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पीडित युवती गेली काही वर्षे सासष्टी तालुक्यातल्या एका गावात असलेल्या क्लिनिक आणि डायग्नोस्टिक सेंटरमध्ये परिचारिका म्हणून कार्यरत होती. पीडितेच्या आईने २५ एप्रिल रोजी सकाळी पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली होती. या तक्रारीनुसार, २२ एप्रिलच्या रात्री सुमारे १२ वाजता आरोपीने पीडितेला तिच्या घरात उपचारासाठी बोलावून संमतीविना लैंगिक अत्याचार केला.

या प्रकरणी कुंकळ्ळी पोलिसांनी बीएनएस कलम ६४ अन्वये गुन्हा नोंदवला आहे. फॉरेन्सिक पथकाने घटनास्थळी भेट देऊन पुरावे, बोटांचे ठसे आदी गोळा केले आहेत. तसेच, क्लिनिकमधील इतर कर्मचाऱ्यांची चौकशी करून जबाब नोंदवले आहेत.पीडितेला वैद्यकीय तपासणीसाठी गोवा मेडिकल कॉलेज (जीएमसी), बांबोळीत नेण्यात आले . पासणीचा अहवाल प्रतीक्षेत आहे. दरम्यान, आरोपी डॉ. अरवाटिगी यालाही वैद्यकीय तपासणीसाठी दक्षिण गोवा जिल्हा रुग्णालयात नेण्यात आले.तपास अधिक प्रभावी करण्यासाठी पोलिसांनी आरोपीच्या ताब्यातील वाहन पोलिस ठाण्यात आणले आहे. आरोपीला न्यायालयात हजर केले असता प्रथम श्रेणी न्यायदंडाधिकाऱ्यांनी (जेएमएफसी, मडगाव) तीन दिवसांची पोलिस कोठडी मंजूर केली आहे. या प्रकरणाचा पुढील तपास कुंकळ्ळी पोलिस निरीक्षक डायगो ग्रासियस यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे.

## पोलिस सतर्क; राज्यभर 'कोम्बिंग ऑपरेशन' सुरू

■ *टीम दैनिक हेराल्ड*

**पणजी, दि. २६ :** जम्मू–काश्मीरमधील पहलगाम येथे घडलेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर देशभरात सुरक्षेचा उच्चस्तरीय इशारा जारी करण्यात आला आहे. या पार्श्वभूमीवर गोवा राज्यातही सुरक्षा यंत्रणा सतर्क झाल्या असून, विविध भागांत 'कोम्बिंग ऑपरेशन' राबविले जात आहेत. राज्यातील महत्त्वाच्या ठिकाणी पोलिस बंदोबस्त वाढविण्यात आला असून, संशयास्पद व्यक्तींची कसून तपासणी केली जात आहे.

जुने गोवे पोलिसांनी सांताक्रुझ मतदारसंघातील चिंबल, मेरशी आणि इंदिरानगर या भागांत विशेष मोहिम राबवली. या कारवाईत २५२ जणांची चौकशी करण्यात आली असून, त्यापैकी २१ जणांना अटक करण्यात आली आहे. तसेच, १२ जणांना ताब्यात घेण्यात आले असल्याची माहिती जुने गोवे पोलिस ठाण्याचे निरीक्षक सतीश पडवळकर यांनी दिली.

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांच्याशी दूरध्वनीद्वारे संवाद साधून राज्यात कठोर सुरक्षा उपाययोजना करण्याच्या सूचना दिल्या. त्यानुसार राज्यभरात पोलिसांनी प्रतिबंधात्मक कारवाई सुरू केली आहे. मुख्यमंत्री सावंत यांनी शनिवारीच 'कोम्बिंग ऑपरेशन' राबविण्याचे संकेत दिले होते.

राज्यातील परप्रांतीय रहिवाशांची ओळखपत्र तपासणी तसेच त्यांची माहिती पडताळून पाहण्यात येत आहे. संशयास्पद हालचाली आढळल्यास संबंधितांची चौकशी केली जात आहे. दरम्यान, पेडणे पोलिसांनी आपला गस्त कार्यक्रम वाढवला आहे. मालपे–पेडणे रेल्वे स्थानक परिसरात प्रवासी आणि पर्यटकांना सुरक्षिततेचा अनुभव देण्यासाठी विशेष खबरदारी घेतली जात आहे. संशयास्पद व्यक्तींची तपासणीही करण्यात येत आहे.

त्याचप्रमाणे, कोकण रेल्वे पोलिसांनीही मडगाव रेल्वे स्थानकावर तपासणी मोहीम राबवून सुरक्षेची पातळी अधिक मजबूत केली आहे.

दुसरीकडे कळंगूट–कांदोळी समुद्रकिनाऱ्यावरील सार्वजनिक सुरक्षेच्या दृष्टीने कळंगुट पोलिसांनी कडक उपाययोजना सुरू केल्या आहेत.समुद्रकिनाऱ्यावरील पट्ट्यात काश्मिरी हस्तकला दुकाने व विविध पर्यटन व्यवसाय चालवणाऱ्या ८० हून अधिक काश्मिरी रहिवाशांची सखोल पडताळणी करण्यात आली आहे, अशी माहिती पोलिसांनी शनिवारी दिली.

पान २ ▶

## मांडवीकाठच्या नऊ जेट्टींविरोधात एनजीटीमध्ये याचिका दाखल

■ *टीम दैनिक हेराल्ड*

**पणजी, दि. २६ :** मांडवी नदीकाठावरील चोराव येथील डॉ. सलीम अली पक्षी अभयारण्याजवळ उभारण्यात आलेल्या नऊ जेट्टींच्या कायदेशीरतेविरोधात राष्ट्रीय हरित न्यायाधिकरणाच्या (एनजीटी) पश्चिम विभागीय खंडपीठात याचिका दाखल करण्यात आली आहे.

ही याचिका पर्यावरणवादी दिक्षय फडते आणि अजित वळवईकर यांनी दाखल केली असून, त्यांनी कॅप्टन ऑफ पोर्ट्स, गोवा कोस्टल झोन मॅनेजमेंट अथॉरिटी आणि अन्य पाच संस्थांना प्रतिवादी केले आहे. याचिकेत, २०११ च्या कोस्टल रेग्युलेशन झोन (सीआरझेड) अधिसूचनेचा हवाला देत, मासेमारीसाठी नसलेल्या जेट्टींना पर्यावरणीयदृष्ट्या संवेदनशील क्षेत्रात परवानगी नाकारावी, अशी मागणी करण्यात आली आहे. तसेच, गोव्याच्या मासेमारी गावांमध्ये सीआरझेड क्षेत्रात अशा जेट्टींची उभारणी थांबवावी, असा आदेश देण्याचीही विनंती याचिकाकर्त्यांनी न्यायाधिकरणाकडे केली आहे.

याचिकाकर्त्यांनी पक्षी अभयारण्याच्या संवेदनशील परिसराचे संरक्षण करण्यासाठी झोनल मास्टर प्लॅन तयार करण्याचीही मागणी केली आहे. संबंधित प्रकरणाच्या नुकत्याच पार पडलेल्या प्राथमिक सुनावणीत, एनजीटीच्या खंडपीठाने , ज्यामध्ये न्यायमूर्ती दिनेश कुमार सिंह आणि तज्ज्ञ सदस्य डॉ. विजय कुलकर्णी सहभागी होते. आदेश दिला की, संबंधित सर्व नऊ जेट्टींच्या जमिनीच्या मालकांना प्रतिवादी म्हणून एका आठवड्याच्या आत समाविष्ट करण्यात यावे. खंडपीठाने स्पष्ट केले की, नियमांचे पालन सुनिश्चित करण्यासाठी आणि कोणत्याही व्यावसायिक उपक्रमांवर निर्बंध घालण्यासाठी, संबंधित जमिनीचे मालकही प्रक्रियेत सहभागी असणे आवश्यक आहे, जोपर्यंत त्यांना सध्याच्या नियमांनुसार विशेष परवानगी प्राप्त होत नाही.

पान २ ▶

# पोप फ्रान्सिस यांना अंतिम निरोप; जागतिक नेत्यांची उपस्थिती

## ४ लाखांहून अधिक शोकग्रस्तांनी घेतले पोप यांचे अंतिम दर्शन | रोमच्या रस्त्यांवर दीड लाखांहून अधिकांची उपस्थिती

रोम ( वृतसंस्था ), दि. २६ :

कॅथोलिक चर्चचे सर्वोच्च धर्मगुरू पोप फ्रान्सिस यांना शनिवारी सेंट पीटर बॅसिलिकामध्ये भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. गरीब आणि स्थलांतरितांचा समर्थक म्हणून ओळखले जाणारे पोप फ्रान्सिस यांच्या अंत्यसंस्कारासाठी जगभरातील ५० हून अधिक देशांचे नेते आणि ११ राजे उपस्थित होते.

अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प, माजी अध्यक्ष जो बायडेन, अर्जेंटिनाचे अध्यक्ष जेवियर मायले, इटलीच्या पंतप्रधान जॉर्जिया मेलोनी, फिलिपिन्सचे अध्यक्ष फर्डिनांड मार्कोस ज्युनियर तसेच युक्रेनचे अध्यक्ष व्होलोडिमिर झेलेन्स्की या समारंभाला उपस्थित होते. झेलेन्स्की यांनी सेवा सुरू होण्यापूर्वी ट्रम्प यांच्याशी खाजगी बैठक घेतल्याचे वृत्त आहे.

सेंट पीटर स्क्वेअरमध्ये सुमारे २ लाख ५० हजार भाविकांनी एकत्र येऊन शेवटच्या दर्शनासाठी गर्दी केली होती. रोमच्या रस्त्यांवर पोप



यांच्या अंत्ययात्रेसाठी दीड लाख लोक उभे होते. जगभरातील कोट्यवधी लोकांनी हा समारंभ थेट प्रक्षेपणाद्वारे पाहिला.

अंत्यसंस्काराच्या समारंभात, दोन तासांच्या प्रार्थनेनंतर पोप फ्रान्सिस यांचे पार्थिव बॅसिलिकामध्ये नेण्यात आले. त्यानंतर, टायबर नदी ओलांडत प्राचीन कोलोसियमजवळून त्यांची अंत्ययात्रा बॅसिलिका डी सांता मारिया मॅगिओरकडे नेण्यात आली, जिथे खाजगीरित्या त्यांच्यावर अंतिम संस्कार करण्यात आले.अंत्यदर्शनासाठी सुमारे ४ लाख शोकग्रस्तांनी सेंट पीटर बॅसिलिकाला भेट दिली होती. शुक्रवारी रात्री कार्डिनल कॅमरलेंगो केविन फॅरेल यांच्या नेतृत्वाखाली पोप यांचे पार्थिव अधिकृतपणे सीलबंद करण्यात आले.अंत्यसंस्काराची सुरुवात हे प्रभु, त्यांना शाश्वत विश्रांती दे आणि त्यांच्यावर शाश्वत प्रकाश पडू दे. या लॅटिन भाषेतील प्रार्थनेने झाली :

श्रद्धांजलीपर भाषणात, इटालियन कार्डिनल जिओव्हानी बॅटिस्टा रे यांनी गरीब आणि निर्वासितांसाठी पोप फ्रान्सिस यांनी केलेल्या कार्याचे गौरव केले. गरिबांच्या बाजूने त्यांची वचनबद्धता कायम होती. त्यांच्या हावभाव आणि उपदेशातून मानवतेची आठवण होते, असे त्यांनी नमूद केले.

कार्डिनल रे यांनी पोप फ्रान्सिस यांच्या शांततेच्या संदेशावरही भर दिला. भिंती नव्हे, पूल बांधा, हा त्यांचा महत्त्वाचा संदेश शोकमग्न जनसमुदायाला पुन्हा एकदा आठवण करून देण्यात आला.समारंभात फ्रेंच, अरबी, पोर्तुगीज, पोलिश, जर्मन आणि मंदारिन यांसह विविध भाषांमध्ये प्रार्थना सादर करण्यात आल्या, ज्यामुळे पोप यांचा जागतिक कॅथोलिक समुदायाशी असलेला संवाद अधोरेखित झाला.

पोप फ्रान्सिस यांनी जुलै २०२४ मध्ये त्यांच्या अंत्यसंस्कारासाठी साधेपणाची इच्छा व्यक्त केली होती. व्हॅटिकनने स्पष्ट केले की हा सोहळा या जगातील एका शक्तिशाली व्यक्तीचा नव्हे तर ख्रिस्ताच्या पाद्री आणि शिष्याचा जीवनप्रवास म्हणून साजरा व्हावा, अशी त्यांची इच्छा होती.समारंभात, बेघर, स्थलांतरित आणि रोमन कॉन्व्हेंटमध्ये राहणाऱ्या ट्रान्सजेंडर महिलांना उपस्थित राहण्यासाठी विशेष आमंत्रण देण्यात आले होते. संत'एजिडिओ धर्मादाय संस्थेने या अतिथींची निवड केली होती, जी उपेक्षित समुदायांमध्ये कार्यरत आहे. पोपच्या विनंतीनुसार, गरीब आणि गरजू व्यक्तींनी बॅसिलिका डी सांता मारिया मॅगिओरच्या पायऱ्यांवर उभे राहून श्रद्धांजली वाहिली. गरिबांना देवाच्या हृदयात विशेष स्थान आहे,असे व्हॅटिकनने यावेळी सांगितले.पोप फ्रान्सिस हे तीन शतकांनंतर पहिल्यांदाच सांता मारिया मॅगिओर येथे दफन झाले. दफनविधी खाजगीरित्या, सार्वजनिक नजरेपासून दूर पार पडला. फ्रान्सिस यांनी अनेक ऐतिहासिक गोष्टी साध्य केल्या . ते पहिले लॅटिन अमेरिकन पोप, पहिले जेसुइट पोप आणि युरोपाबाहेरील पहिले आधुनिक काळातील पोप होते.२०१३ मध्ये पोपपदी निवड झाल्यानंतर त्यांनी चर्चमध्ये महिलांसाठी अधिक सहभाग वाढवण्यासह अनेक प्रगतीशील सुधारणा केल्या. मात्र, त्यांच्या कार्यकाळात पाद्री लैंगिक शोषण घोटाळ्यांसह अनेक आव्हानेही आली. सुधारणा असूनही, काही टीकाकारांचा असा दावा आहे की अजून बरीच सुधारणा आवश्यक आहे. चर्चच्या रूढीवादी गटाकडून त्यांना त्यांच्या समलैंगिक संबंधांबाबतच्या उदारमतवादी भूमिकेसाठी टीका सहन करावी लागली. मी कोण आहे न्याय करायला? या त्यांच्या विधानाने मोठी चर्चा निर्माण केली होती, जरी त्यांनी चर्चची मूलभूत शिकवण कायम ठेवली होती.यावर्षीच्या सुरुवातीला, त्यांनी ट्रम्प प्रशासनाच्या स्थलांतर धोरणांवर टीका केली होती आणि उपाध्यक्ष जेडी व्हान्स यांच्या धार्मिक समर्थनावरही प्रश्न उपस्थित केला होता. व्हान्स हे पोपना भेटणाऱ्या शेवटच्या पाहुण्यांपैकी एक होते.पोप फ्रान्सिस यांच्या निधनानंतर आता कार्डिनल्सची परिषद भरवली जाणार आहे, जिथे नव्या पोपची निवड केली जाईल.